Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Ph:+91-1872-220186, Fax: +91-1872-224186, Mob. +91-98154-94687, E-mail:ansarullahbharat@gmail.com


نمبر حوالہ/Ref ______ تاریخ/Date ______

# पवित्र प्रेषित मुहम्मद ﷺ यांचे सत्यनिष्ठ सेवक, सय्यिदना हजरत अकदस मसीह मौऊद (अलैहिस्सलाम) यांच्या करुणा, प्रेम, उदारता आणि दानशूरतेच्या श्रद्धावर्धक आठवणी.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔
إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔
صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

(सय्यदना अमीरुल मोमिनीन हजरत मिर्झा मसरूर अहमद, खलीफतुल मसीह पंचम (अय्यदहुल्लाहु तआला बिनस्रिहिल अजीज) यांनी ३ जुलै २०२६ (३ वफा १४०५ हिजरी शम्सी) रोजी, मुबारक मशिद, इस्लामाबाद, यूके येथे दिलेल्या शुक्रवारच्या खुतब्याचा संक्षिप्त सारांश.)

तशहहुद, तअव्वुझ आणि सूरह अल्-फातिहा यांचे पठण केल्यानंतर हुजूर अन्वर (अय्यदहुल्लाहु तआला बिनस्रिहिल अजीज) यांनी फरमावले: "मी आज हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांच्या करुणा, प्रेमळ स्वभाव आणि उदारता-दातृत्व यांची काही उदाहरणे मांडणार आहे.

हजरत शेख याकूब अली इरफानी साहेब (र.अ.) लिहितात की, हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांची दानशूरता अथांग समुद्रासारखी होती. त्यांच्या दानाचा हात जणू मोत्यांचा वर्षाव करणाऱ्या मेघाप्रमाणे होता—तो सतत बरसत राहायचा आणि लोकांना तृप्त करत राहायचा. विशेषतः रमजानच्या महिन्यात हा उदारतेचा आणि दानशूरतेचा सिलसिला अधिकच वाढत असे. अब्दुल गफ्फार काश्मीरी साहेब सांगतात की, जेव्हा त्यांचा विवाह झाला, तेव्हा हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांनी त्यांना दोन मौल्यवान दागिने भेट म्हणून दिले. ही घटना हुजूर (अ.स.) यांच्या दाव्यापूर्वीची आहे, जेव्हा ते अजून एकांतवासाचे जीवन व्यतीत करत होते.

बशीर साहेब भट्टी यांच्या मातोश्री सांगतात की, हजरत मिर्झा बशीरुद्दीन महमूद अहमद साहेब (र.अ.) यांच्या विवाहाच्या प्रसंगी एक मिरासी स्त्री ढोल घेऊन आली आणि तो वाजवू लागली. त्यावर हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांनी सांगितले, 'तिला सांगा की तिने ढोल वाजवू नये, आणि ती जे काही मागते ते तिला द्या.'

त्यानुसार तिला चार-पाच रुपये देण्यात आले. त्यानंतर ती म्हणाली की, 'मला थंडी वाजते.' तेव्हा हुजूर (अ.स.) यांनी तिच्यासाठी एक रजईही देण्याची व्यवस्था केली.

हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांना कोणत्याही प्रकारच्या विशेष किंवा आलिशान पोशाखाची आवड नव्हती. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या काही वर्षांत त्यांच्याकडे शिवलेले कपडे, विशेषतः कोट इत्यादी, मोठ्या प्रमाणावर येत असत. मात्र पगडी ते बहुतेक वेळा स्वतः विकत घेऊन बांधत असत. जसे कपडे तयार हजरत मिर्झा बशीर अहमद साहेब (र.अ.) सांगतात की, सर्वप्रथम ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की होत असत, तसेच ते खर्चही होत असत; म्हणजेच जे लोक तबर्रुक म्हणून मागत, त्यांना ते आनंदाने देऊन टाकत असत.

हजरत मीर मेहदी हुसेन साहेब (र.अ.) सांगतात की, एकदा मौलवी मुहम्मद अहसन साहेब यांनी माझ्याकडे 'चश्मा-ए-मसीही' या पुस्तकाची एक प्रत मागितली. मी उत्तर दिले की, हुजूर (अ.स.) यांनी सांगितले आहे की कार्यालयात या पुस्तकाच्या काही प्रती कायम उपलब्ध असाव्यात, कारण कधीकधी सरकारकडून त्यांची मागणी येते. सध्या एकही अतिरिक्त प्रत उपलब्ध नाही. आपण हजरत साहेब (अ.स.) यांच्या सेवेत पत्र लिहून विनंती करू शकता. त्यांनी पत्र लिहिल्यानंतर हुजूर (अ.स.) यांनी त्यांना कृपापूर्वक त्या पुस्तकाची एक प्रत प्रदान केली.

हजरत मुन्शी ज़फर अहमद साहेब (र.अ.) सांगतात की, हुजूर (अ.स.) यांच्याकडे कस्तुरी (मश्क) असायची. एकदा मी विनंती केली, 'हुजूर, मला थोडी कस्तुरी हवी आहे.' त्यावर हुजूर (अ.स.) यांनी कस्तुरी ची डबी माझ्यासमोर ठेवली आणि म्हणाले, 'तुम्हाला जितकी हवी तितकी घ्या.' मी त्यातून थोडीशी कस्तुरी घेतली, तेव्हा हुजूर (अ.स.) हसून म्हणाले, 'ही तर काहीच नाही.' त्यानंतर त्यांनी स्वतःहून मला सुमारे दीड तोळयाएवढी कस्तुरी कृपापूर्वक दिली.

हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांच्या अंतःकरणात आपल्या सहकाऱ्यांबद्दल किती अपार प्रेम आणि वेदना होती, याचे एक उदाहरण असे आढळते. हजरत हकीम फज़लुर्रहमान साहेब (र.अ.) सांगतात की, माझ्या पत्नीला मूल झाले होते आणि प्रसूतीनंतर सातव्या दिवशी मगरीबच्या सुमारास तिला आकडी (तशन्नुज) येण्याची लक्षणे दिसू लागली. मी मगरीबच्या नमाजनंतर धावत हुजूर (अ.स.) यांच्या सेवेत गेलो. हुजूर (अ.स.) म्हणाले, 'हा अतिशय धोकादायक आजार सुरू होण्याचा इशारा आहे. तुम्ही तुमच्या पत्नीला हिंग द्या आणि दीड तासानंतर मला पुन्हा येऊन तिची प्रकृती सांगा.' ईशाच्या नमाजनंतर मी पुन्हा गेलो आणि अर्ज केला की तिची प्रकृती अधिकच बिघडली आहे. हुजूर (अ.स.) विविध औषधे सुचवत राहिले, पण आजार वाढतच गेला. शेवटी एका टप्प्यावर रुग्णेला उलटी झाली, जी या आजारातील शेवटची अवस्था मानली जाते. त्यानंतर तिचा श्वास अडखळू लागला, मान मागे ओढली गेली, डोळ्यांसमोर अंधार आला आणि तिची वाचा बंद झाली. मी धावत जिना चढून हुजूर (अ.स.) यांच्या घरी पोहोचलो. माझा आवाज ऐकताच त्यांनी दार उघडले

आणि विचारले, 'काय झाले, सर्व ठीक आहे ना?' मी उत्तर दिले, 'आता तिची प्रकृती अत्यंत गंभीर झाली आहे.' सर्व हकिगत ऐकल्यानंतर हुजूर (अ.स.) म्हणाले, 'जगातील जेवढी साधने आणि उपाय होते ते आपण सर्व करून पाहिले आहेत. आता फक्त एकच उपाय उरला आहे, तो म्हणजे दुआ. तुम्ही आता जा. मी आता दुआमध्ये मग्न होतो आणि ती पूर्णपणे बरी होईपर्यंत प्रार्थनेतून डोके वर काढणार नाही-हे ऐकून मी परत आलो आणि पत्नीला म्हणालो, 'आता तुला कसली चिंता? आता तर स्वतः ठेकेदारानेच ठेका घेतला आहे.' (म्हणजेच, आता हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांनी स्वतः दुआची जबाबदारी स्वीकारली आहे.) त्या वेळी रात्रीचे दोन वाजले होते. मी घरी आलो आणि रुग्णेला त्याच अवस्थेत सोडून दुसऱ्या खोलीत जाऊन झोपलो. सकाळी एखाद्या भांड्याच्या आवाजाने मला जाग आली. मी पाहिले तर माझी पत्नी पूर्णपणे बरी झाली होती. तिने सांगितले, 'तुम्ही तर झोपले होते. साधारण दोन तासांनंतर अल्लाह तआलाने आपल्या कृपेने मला पूर्ण आरोग्य दिले.'

हजरत खलीफतुल मसीह यांनी फरमावले की, या घटनेतून मित्रांप्रती असलेली करुणा आणि उदारता या दोन्हींची सर्वोच्च उदाहरणे दिसून येतात.

एकदा कादियानमधील जमातीचा एक कट्टर विरोधक आपल्या एका नातेवाइकासाठी कस्तुरी (मश्क) मिळवण्याच्या शोधात होता. त्या काळी केवळ कस्तुरी सहज उपलब्ध नव्हती असेच नव्हे, तर ती अत्यंत मौल्यवान वस्तू होती. तो हजरत मसीह मौऊद ं यांच्या दारात आला आणि कस्तुरीची विनंती केली. हजरजेव्हा प्लेगची साथ पसरली, तेव्हा हजरत मसीह मौऊद ं यांनी अल्लाह तआलाच्या वह्य (दैवी प्रकटीकरण) आणि दैवी ज्ञानाच्या मार्गदर्शनाखाली एक औषध तयार करण्यास सुरुवात केली. त्या औषधाला **"तिर्याक-ए-इलाही"** असे नाव दिले. या औषधात हजारो रुपयांचे मौल्यवान रत्ने तसेच अनेक दुर्मिळ आणि किमती औषधी घटक मिसळण्यात आले.हे औषध तयार झाल्यानंतर हजरत ं यांनी अत्यंत उदारतेने ते लोकांमध्ये वाटले. बाहेरगावाहून ज्यांनी या औषधाची मागणी केली, त्यांनाही स्वतःच्या खर्चाने नोंदणीकृत पार्सलद्वारे (Registered Parcel) हे औषध पाठवत राहिले.त यांनी तत्काळ सुमारे अर्धा तोळा कस्तुरी त्याला देऊन टाकली-

हजरत मुफ्ती मुहम्मद सादिक साहेब ँ यांनी आपल्या पत्रात हजरत मसीह मौऊद ं यांना लिहिले की, गर्भधारणेमुळे घरात अशी परिस्थिती आहे की जेवण तयार करणे शक्य होत नाही. भाकरी तंदूरवर भाजून घेता येते, परंतु भाजी किंवा रस्सा (हांडी) बनवणे अत्यंत कठीण आहे. म्हणून त्यांनी विनंती केली की लंगरमधून जेवणाची व्यवस्था करून द्यावी. यावर हजरत ं यांनी लंगरच्या प्रभारी व्यक्तीस निर्देश दिले की, मुफ्ती साहेबांना लंगरमधून दिवसातून दोन वेळा उत्तम दर्जाचा सालन (भाजी/रस्सा) नियमितपणे देण्यात यावा-एकदा संशोधनासाठी नसीबीन येथे एक शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या शिष्टमंडळातील प्रत्येक सदस्याला प्रवासाच्या तयारीसाठी हजरत मसीह मौऊद  यांनी प्रत्येकी पन्नास रुपये प्रदान केले. नंतर काही कारणांमुळे ते शिष्टमंडळ जाऊ शकले नाही. तेव्हा त्या शिष्टमंडळातील एका सदस्याने ते पन्नास रुपये परत करण्याची इच्छा व्यक्त केली.

यावर हजरत  यांनी फरमावले, 'आम्ही एखाद्याला जे एकदा देतो, ते कधीही परत घेत नाही.'

एकदा लंगरसाठीचा खर्च संपला. तेव्हा हजरत मसीह मौऊद ं यांनी फरमावले, 'बीबी साहिबांकडून एखादा दागिना घ्या. जो योग्य किंमत मिळवून विकू शकेल, त्याच्यामार्फत तो विकून आवश्यक सामानाची व्यवस्था करा.'दोन दिवसांनी पुन्हा खर्च संपला. तेव्हा हजरत यांनी फरमावले, 'आपण बाह्य साधनांचा विचार करून आवश्यक व्यवस्था केली होती. आता त्याची गरज नाही. ज्याचे आपण पाहुणे आहोत, तो स्वतःच व्यवस्था करील.'त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे आठ-नऊ वाजता टपालवाहक आला. त्याच्या हातात सुमारे दहा ते पंधरा मनीऑर्डर होते. त्यांपैकी काही शंभर रुपयांचे तर काही पन्नास रुपयांचे होते, आणि ते विविध ठिकाणांहून आले होते. हजरत  यांनी ते मनीऑर्डर  स्वीकारले आणि त्यानंतर"हजरत ं यांनी तवक्कुल (अल्लाहवरील पूर्ण भरोसा) याविषयी भाषण केले.

 एकदा भीषण दुष्काळ पडला असता, हजरत मसीह मौऊद यांनी आदेश दिला की लंगरमध्ये सतत पीठ मळले जावे आणि भाकरी तयार ठेवली जावी. जो कोणी भाकरी मागण्यासाठी येईल, त्याला भाकरी दिली जावी आणि कोणालाही रिकाम्या हाताने परत पाठवू नये.हवरील संपूर्ण विश्वास (तवक्कुल) या विषयावर प्रभावी भाषण केले. हजरत शेख हामिद अली साहेब ँ सांगतात की, हजरत मसीह मौऊद ं यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत माझ्याकडून कधीही हिशोब मागितला नाही आणि कधीही माझ्यावर नाराज झाले नाहीत.

एकदा हजरत शेख अहमद दीन साहेब ँ यांना हजरत मसीह मौऊद ं यांनी एका कामानिमित्त पाठवले आणि दुसऱ्या दिवशी लवकर परत येण्याची सूचना दिली. ते सांगतात की, मी दुसऱ्या दिवशी उशिरा पोहोचलो, तेव्हा हजरत ं माझी काळजी वाटून माझ्या शोधासाठी आधीच एक व्यक्ती पाठवली होती. मी हजरत ं यांच्या सेवेत उपस्थित झालो, तेव्हा सर्वप्रथम त्यांनी विचारले, 'आपल्याला काही त्रास तर झाला नाही ना?' हजरत ं यांनी इतक्या प्रेमाने माझी विचारपूस केल्यामुळे माझे मन अतिशय आनंदित झाले. त्यानंतर मी खर्चाचा हिशोब देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा हजरत ं यांनी फरमावले, 'आपला आणि आमचा कसला हिशोब? हे पैसे तुम्ही तुमच्या स्वतःच्या गरजांसाठीच खर्च करा.'

एकदा हजरत हकीम मौलवी नूरुद्दीन साहेब ँ यांनी हजरत मसीह मौऊद ं यांच्याकडून काही रक्कम उसने घेतली. नंतर त्यांनी ती रक्कम परत पाठवली, तेव्हा हजरत ं यांनी ते पसंत केले नाही आणि फरमावले, 'आपण आमचे पैसे आपल्या पैशांपेक्षा वेगळे समजता काय?'हजरत शेख याकूब अली साहेब इरफानी ँ लिहितात की, हजरत मसीह मौऊद ं यांनी आपल्या दैवी नियुक्तीची (बअसतची) घोषणा केल्यापासून आणि लोकांना हेही समजले की अल्लाह तआलाने त्यांना ही शुभवार्ता दिली आहे की, 'राजेसुद्धा तुझ्या वस्त्रांमधून बरकत शोधतील,' तेव्हापासून लोक सर्वसाधारणपणे हजरत ं यांच्याकडे त्यांच्या वस्त्रांची मागणी करू लागले. हजरत ं यांनी कधीही कोणालाही नकार दिला नाही. काही वेळा तर अशी

परिस्थिती निर्माण होत असे की, त्यांच्या अंगावर जे कपडे परिधान केलेले असत, तेवढेच उरत आणि उर्वरित सर्व कपडे ते लोकांना देऊन टाकत असत.

एकदा हजरत मसीह मौऊदؑ यांच्या घरी एका गरीब स्त्रीने थोडे तांदूळ घेतले. लोकांनी तिला पाहिले आणि गोंधळ उडाला. त्या वेळी हजरत मसीह मौऊदؑ आपल्या खोलीत काही काम करत होते. गोंधळाचा आवाज ऐकून ते बाहेर आले. त्यांनी पाहिले की, एक अत्यंत गरीब आणि दीनवाण्या अवस्थेतील स्त्री उभी आहे आणि तिच्या हातात थोड्याशा तांदळाची एक गाठोडी आहे-हजरत मसीह मौऊदؑ यांना जेव्हा हा प्रकार समजला आणि त्यांनी त्या गरीब स्त्रीची दयनीय अवस्था पाहिली, तेव्हा त्यांचे हृदय करुणेने भरून आले. त्यांनी फरमावले, 'ही स्त्री उपाशी आणि अत्यंत गरिब दिसते. तिला थोडे तांदूळ देऊन सन्मानाने निरोप द्या; शिवाय आणखीही काही द्या. आणि अल्लाहप्रमाणे इतरांचे दोष झाकण्याचा (सत्तारीचा) गुण अंगीकारा. हजरत मिर्झा बशीर अहमद साहेबؓ हा प्रसंग वर्णन करून लिहितात की, या घटनेबद्दल एखादा उतावळा मनुष्य असे म्हणू शकतो की, यामुळे चोरी करण्याचे धाडस वाढेल किंवा एका चोराला अधिक धैर्य दिले जात आहे. परंतु सुज्ञ आणि विवेकी लोक समजतात की, जेव्हा ते धन स्वतः हजरत मसीह मौऊदؑ यांचेच होते आणि ते घेणारी स्त्री उपासमारीने त्रस्त, अत्यंत गरीब व दीन होती, तेव्हा हा चोरीला प्रोत्साहन देण्याचा प्रकार नव्हता; उलट तो खऱ्या अर्थाने गरिबाला अन्न देण्याच्या (इतआम-ए-मिस्कीन) कार्यातच मोडतो.

हदीसांमधूनही सिद्ध होते की, हजरत मुहम्मद मुस्तफा ﷺ यांनी अशा परिस्थितीत, जेव्हा चोरी करणारी व्यक्ती अत्यंत गरीब असेल आणि ती तीव्र उपासमारीमुळे खाण्याची एखादी वस्तू घेत असेल, तेव्हा तिला चोर ठरवले नाही; उलट तिच्याकडे दुर्लक्ष करून दयाळूपणा दाखवला. हीच आपल्या आका ﷺ यांच्या परिपूर्ण अनुकरणाची (इत्तिबा) तेजस्वी उदाहरणे आहेत.

اَللّٰهُمَّ صَلِّ عَلٰى مُحَمَّدٍ وَعَلٰى عَبْدِكَ الْمَسِيحِ الْمَوْعُودِ وَبَارِكْ وَسَلِّمْ

'

اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِی الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔